पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३७६ दिनांक - २१/०५/२०२३**

## खंडणी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर

## खुनाच्या प्रयत्नातील पाहिजे आरोपींच्या आवळल्या मुसक्या

खंडणी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर पथकातील अधिकारी सपोनि.अभिजीत पाटील व पोलीस अंमलदार,संजय भापकर, फुलपगारे, राजेंद्र लांडगे, प्रफुल्ल चव्हाण असे रेकॉर्डवरील पाहिजे आरोपींचा शोध घेत असताना,खंडणी विरोधी पथकातील पोलीस अंमलदार, राजेंद्र लांडगे यांना खडकी पोलीस ठाणे गु.र.नं.१२३/२०२३,भा.दं.वि.कलम३०७,३५४,३२४,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९, महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७(१)१३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ या गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे **सैय्यद नुर जानशा इराणी व महिला आरोपी रुक्साना सैय्यद नुर इराणी,**हे दोघे त्यांची ओळख लपवुन, बिबवेवाडी ओटा येथे असल्याची माहिती त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती.

त्यानुसार **आरोपी नामे सैय्यद नुर जानशा इराणी,वय-५४ वर्षे,रा.पाटकर प्लॉट नं.८,महात्मा गांधी वसाहत,ईराणी गल्ली, मुंबई-पुणे रोड,शिवाजीनगर,पुणे व महिला आरोपी रुक्साना सैय्यद नुर इराणी,वय-५१ वर्षे,रा.सदर यांना सदर परिसरातुन ताब्यात घेवुन,**त्यांचेकडे तपास केला असता,त्यांनी त्यांचे साथीदारां सोबत मिळुन वरील गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे.

आरोपी नामे सैय्यद नुर जानशा इराणी व महिला आरोपी रुक्साना सैय्यद नुर इराणी यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यांना खडकी पोलीस ठाणे गु.र.नं.१२३/२०२३,भा.दं.वि.कलम ३०७,३५४,३२४,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९,महाराष्ट्र पोलिस अधि. कलम ३७(१)१३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ चे तपासकामी खडकी पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा.सहा. पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली,खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक, श्री.अजय वाघमारे यांचे सुचनेप्रमाणे स.पो.नि.अभिजीत पाटील, सपोफौ.प्रविण ढमाळ, पोलीस अंमलदार, संजय भापकर, रविंद्र फुलपगारे, नितीन कांबळे, राजेंद्र लांडगे, प्रफुल्ल चव्हाण व महिला पोलीस अंमलदार, ज्योती मुलका यांनी केली आहे.